**प्रसिध्दी पत्रक** दिनांक : १३/०८/२०२५

**माहुर तहसिल कार्यालयाचे गेट समोरील मुद्रांक विक्रेता अमृत श्रीरंग जगताप यांनी १००/— रूपयाचे मुद्रांक (बॉण्ड पेपर) ला २० रूपये अतिरिक्त असे एकूण १० मुद्रांका करीता २००/— रूपये लाच मागणी करुन तडजोडीअंती १५०/— रुपये लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | माहुर जि.नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.नं १४२/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक १२.०८.२०२५ रोजी २३.५० वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुदद्दा व पत्ता | अमृत श्रीरंग जगताप, वय ५६ वर्ष, व्यवसाय – मुद्रांक विक्रेता, रा.आबासाहेब पारवेकर नगर, पांडवलेणी रोड, माहूर ता. माहूर, जि. नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २००/— रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | १५०/— रूपये |

**थोडक्यात माहिती**

यातील तक्रारदार नमूद लोकसेवक यांचेकडून दिनांक ०८/०८/२०२५ रोजी १००/— रूपयाचे मुद्रांक (बॉण्ड पेपर) खरेदीसाठी गेले होते. तेव्हा यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांना १००/— रूपयाचे मुद्रांक (बॉण्ड पेपर) हे १२०/— रूपयास विक्री केले होते. तेंव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक यांना अधिकचे २०/— रूपये कशाचे अशी विचारणा केली असता लोकसेवक तक्रारदार यांना म्हणाले की ते ईतर व्यक्तींकडून १३०/— रूपये घेतात परंतु तक्रारदाराजवळून फक्त १२० रूपये घेतले आहे. त्यावेळी तक्रारदार यांना कामाची गरबड असल्यामुळे तक्रारदार यांनी नाईलाजा स्तव १००/— रूपये किंमतीचे मुद्रांक १२०/— रुपयास खरेदी केले.

त्यानंतर तक्रारदार यांना शेतकरी आत्मा बचतगट करीता १००/— रूपये दराच्या १० मुद्रांकाची (बॉण्ड पेपरची) गरज होती. मुद्रांक विक्रेता अमृत जगताप हा प्रत्येक मुद्रांकाच्या पाठीमागे २० रूपये अतिरिक्त असे एकूण १० मुद्रांका करीता २००/— रूपये घेतल्याशिवाय मुद्रांक देणार नाही व मुद्रांक विक्रेता घेत असलेली अतिरिक्त रक्कम २००/— रूपये हा गैरफायदा/अन्यायाची प्राप्ती undue advantage, असून ती देण्याची तक्रारदार यांना मुळीच इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक ११/०८/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे सदर बाबत लेखी तक्रार दिली होती.

दिनांक १२/०८/२०२५ रोजी सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासकीय पंचांसमक्ष पडताळणी केली असता यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांना १००/— रू दराचे १० मुद्रांक देण्याकरीता नियमा प्रमाणे १०००/— रूपयांऐवजी १,२००/— रूपयांची मागणी केली. नमुद रकमे मध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे २००/— रूपयाच्या गैरफायद्याची undue advantage मागणी करून तडजोडअंती १५०/— रूपये गैरफायद्याची रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली.

दिनांक १२/०८/२०२५ रोजी माहूर तहसिल कार्यालयाच्या गेट समोर सापळा कारवाईचे आयोजन केले असता यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांना १००/— रू दराचे १० मुद्रांक (बॉण्ड पेपर) देण्याकरीता तक्रारदार यांचेकडून ११५०/— रूपये स्वीकारले. त्यामध्ये १००/—रुपये दराच्या १० मुद्रांकाची एकूण किंमत १०००/— रूपये व गैरफायद्याची रक्कम १५०/— रूपये अशी रक्कम पंचासमक्ष स्वीकारलेली आहे. म्हणुन पोस्टे माहुर येथे गुरनं १४२/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, डॉ. संजय तुंगार अपर पोलीस अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती अर्चना करपुडे, पोलीस निरीक्षक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.



| संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :— 02462—253512<br>टोल फ्री कमांक— 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9359056840 | पोलीस उपअधीक्षक 9359056840 |
| ई—मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई—मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |



कार्यालय,पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड